**ठळक बातम्या**

- राज्य सरकार दाओसमध्ये झालेल्या करारांची चोख अंमलबजावणी करेल, अशी उद्योगमंत्र्यांची ग्वाही
- राज्यातल्या देवस्थान इनाम जमिनी, कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावे करण्यासाठी समिती नेमल्याची महसूल मंत्र्यांकडून विधानसभेत माहिती
- विधान परिषदेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी
- सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कोठडीत झालेल्या मृत्यूला पोलीसच जबाबदार असल्याचं दंडाधिकाऱ्यांच्या चौकशीत समोर आल्याची राज्य मानवाधिकार आयोगाची माहिती

**आणि**

- ट्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या भारतीय जोडीचा स्विस ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश

**<><><><><>**

दाओसमध्ये झालेल्या करारांमुळे राज्यात १६ लाख रोजगार निर्मिती होणार असून, त्यादृष्टीनं राज्य सरकार या करारांची चोख अंमलबजावणी करेल, अशी ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. या करारांच्या अंमलबजावणीबाबत विरोधकांनी केलेले आरोप त्यांनी फेटाळून लावले, त्याउलट महाविकास आघाडी सरकारच्या काळात झालेल्या करारांची अंमलबजावणी झालेली नाही असं ते म्हणाले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे, हे माहीत असूनही विरोधक निवडणुका होत नसल्याबद्दल सरकारला दोष देऊन दिशाभूल करत आहेत अशी टीका त्यांनी केली.

राज्यात ग्रामीण भागात स्टार्टअपला अधिक प्रोत्साहन देण्यासाठी नेक्स्ट डोअर स्टार्टअप योजना सुरू केली जाणार आहे, याअंतर्गत १ लाख नवे स्टार्टअप सुरू करण्याचं उद्दिष्ट समोर ठेवलं असल्याचं, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी यासंदर्भातल्या प्रश्नाला उत्तर देतांना सांगितलं. रायगड जिल्ह्यात महाड इथं बारा बलुतेदारांसाठी विश्वकर्मा भवन सुरू करणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.

सरकारच्या घरकुल योजनांतर्गत कोणीही लाभार्थी घरापासून वंचित राहू नये, यासाठी सर्वेक्षण करण्याची घोषणा, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी केली. भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्यासाठी गायरान, गावठाण जमिनी देण्याचा निर्णय घेतला आहे, अशा जागा उपलब्ध नसतील तर लाभार्थ्याला जागा खरेदीसाठी एक लाख रुपये दिले जातील अशी माहिती त्यांनी सभागृहाला दिली.

छत्रपती संभाजीनगर इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात नवीन शस्त्रक्रिया इमारत बांधण्याचा प्रस्ताव विचाराधीन असून, यासाठी ७३१ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे, अशी माहिती, माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सभागृहाला दिली.

अब्दुल कलाम अमृत आहार योजनेअंतर्गत आदिवासी क्षेत्रातील लाभार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या आहाराच्या खर्चात वाढ करण्यासाठी आदिवासी विभागाकडे प्रस्ताव पाठवण्याचं आश्वासन महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी सभागृहाला दिलं. नागरी भागातल्या कुपोषित बालकांनाही पोषण आहार देण्याचा विचार सरकार करत असल्याचं त्यांनी यासंदर्भातल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं.

जलजीवन अभियानाच्या कामात दिरंगाई करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई केली जाईल, आत्तापर्यंत ३३७ कंत्राटदारांना नोटीसा बजावल्या असून,

यांच्याकडून ९१ लाखांचा दंड वसूल केला असल्याची माहिती पाणीपुरवठा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी एका तारांकित प्रश्नाच्या उत्तरात दिली.

**<><><><><>**

राज्यातल्या देवस्थान इनाम जमिनी, कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावे करण्यासाठी महसूल विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत दिली. या समितीत आणखी तज्ज्ञांचा समावेश केला जाईल, आणि समितीनं दिलेल्या अहवालानुसार विधीमंडळात विधेयक मांडलं जाईल असं त्यांनी सांगितलं. विधानसभेच्या आज झालेल्या विशेष बैठकीत लक्षवेधी सूचना चर्चेला घेतल्या गेल्या, त्यात यासंबंधीची सूचना गोपीचंद पडळकर यांनी उपस्थित केली होती. चंद्रपूर जिल्ह्यात जिवती तालुक्यातल्या वन जमिनी शेतकऱ्यांना देता याव्यात, यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करू, वन विभागाला अन्य जमिनी देऊन या जमिनी सोडवून घेऊ असं आश्वासनही त्यांनी दिलं.

राज्यातल्या अपूर्ण राहिलेल्या धरणांची कामं पूर्ण करण्यासाठी प्राधान्यक्रम ठरवला जाईल असं जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी, उत्तम जानकर यांनी मांडलेल्या लक्षवेधीला उत्तर देतांना सांगितलं.

**<><><><><>**

मुंबईतल्या काँक्रीटच्या रस्त्यांच्या कामांचा दर्जा निकृष्ट असल्याच्या मुद्यावर येत्या सोमवारी बैठक घेण्याचे निर्देश विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिले आहेत. यावेळी नार्वेकर यांनी, त्यांच्या स्वतःच्या मतदारसंघातली कामं रखडल्याचं नमूद करत, खड्डेमुक्त मुंबई या संकल्पनेला गालबोट लागल्याची प्रतिक्रियाही व्यक्त केली. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचं आश्वासन प्रभारी मंत्री उदय सामंत

यांनी दिलं. भाजपाचे अतुल भातखळकर यांनी हा प्रश्न उपस्थित केला होता. याबाबत पराग अळवणी, अमित साटम, योगेश सागर, आदित्य ठाकरे, अमित देशमुख, वरुण सरदेसाई या सदस्यांनीही नाराजी व्यक्त केली.

मुंबई महानगरपालिकेची परवानगी न घेता उभारलेल्या होर्डिंग्जच्या प्रकरणातही कठोर कारवाई करत, जबाबदार कंत्राटदाराविरुद्ध फौजदारी कारवाई करण्याचं आश्वासनही उदय सामंत यांनी यासंदर्भातल्या प्रश्नाला उत्तर देताना दिलं.

दरम्यान आज प्रश्नोत्तराला सुरुवात झाली तेव्हा उत्तरं देण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सभागृहात उपस्थित नव्हते, त्याबद्दल दोन्ही बाजूच्या सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली, त्यावर अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कामकाज दहा मिनिटांसाठी तहकूब केलं, त्यानंतर कामकाज पुन्हा सुरू झालं.

**<><><><><>**

परभणी इथं सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कोठडीत झालेल्या मृत्यूला पोलीसच जबाबदार असल्याचं दंडाधिकाऱ्यांच्या चौकशीत समोर आल्याची माहिती महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगानं काल दिली. या प्रकरणातल्या विविध तक्रारींची सुनावणी काल आयोगासमोर झाली आणि आयोगानं मुख्य सचिव, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, गुन्हे अन्वेषण विभागाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक, तसंच परभणीचे सीआयडी पोलीस उपअधीक्षक यांना नोटीस बजावली आणि अहवाल मागवले. तसंच दंडाधिकाऱ्यांच्या अहवालात ज्या पोलिसांना सूर्यवंशी यांच्या मृत्यूला जबाबदार धरलं आहे, त्यांची बाजू ऐकून घेण्यासाठी आयोगानं त्यांनाही नोटिस पाठवली.

परभणीत भारतीय राज्यघटनेच्या प्रतिमेची मोडतोड झाल्यानंतर झालेल्या हिंसाचारप्रकरणी ३५ वर्षांच्या सोमनाथ सूर्यवंशी यांना पोलिसांनी अटक केली

होती. १५ डिसेंबर रोजी परभणीतल्या सरकारी रुग्णालयात त्यांचा मृत्यू झाला. हा मृत्यू आजारपणामुळे झाल्याचा दावा पोलिसांनी केला होता.

**<><><><><>**

मुंबई विद्यापीठात रोबोटिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता केंद्र स्थापन केलं जाणार आहे. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी ही माहिती दिली आहे. नुकताच मुंबई विद्यापीठ आणि रोबोटिक्स क्षेत्रात कार्यरत असलेल्या जॅन्युटेक इंडस्ट्री यांच्यात या संदर्भात एक सामंजस्य करार झाला आहे. या कराराच्या अनुषंगानं रोबोटिक्स सिस्टम, ऑटोमेशन, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारीत एप्लीकेशन्सवर विद्यार्थी आणि संशोधकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि प्रकल्पांवर काम करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

या सेंटरच्या माध्यमातून अत्याधुनिक रोबोटिक प्रणालींसह प्रत्यक्ष प्रशिक्षणाचा समावेश असलेला ‘एमटेक इन रोबोटिक्स’ हा पदव्युत्तर अभ्यासक्रम याच शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना उपलब्ध होईल. मुंबई विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड अप्लायड सायन्सेस, कल्याण इथल्या सुमारे ४५ हजार चौरस फुटावर हे सेंटर तयार केलं जाणार आहे.

**<><><><><>**

राज्य विधान परिषदेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी आज झाला. चंद्रकांत रघुवंशी, दादाराव केचे, संजय केणेकर, संजय खोडके, संदीप जोशी यांना सभापती राम शिंदे यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सदस्यांचा परिचय सभागृहाला करून दिला.

**<><><><><>**

ट्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या भारताच्या मानांकित महिला बॅडमिंटनपटू जोडीनं स्विस ओपन बॅडमिंटन स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. त्यांनी जर्मनीच्या एमिली लेहमन आणि सेलीन हब्शचा २१-१२, २१-८ असा पराभव केला. उपांत्य फेरीत प्रवेश करण्यासाठी त्यांचा सामना हाँगकाँग-चीनच्या येउंग नगा टिंग आणि येउंग पुई लाम या जोडीविरुद्ध होणार आहे.

**<><><><><>**

११ व्या आशियाई जलतरण स्पर्धेचे यजमानपद भारताकडे असणार आहे. अहमदाबादमधे नारनपुरा क्रीडा संकुलात १ ते १५ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेत पोहणे, डायव्हिंग, आणि वॉटर पोलो यासारख्या विविध जलतरण स्पर्धांचा समावेश असेल.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या देवगड हापुस आंब्याच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीला आळा घालण्यासाठी या वर्षीपासून या आंब्यावर यूनिक आयडी कोड लावण्यात येणार आहे. देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेने हा निर्णय घेतला आहे. या नवीन पद्धतीनुसार, अस्सल हापुस आंब्यावर हा स्टिकर लावणं बंधनकारक होणार आहे. या स्टिकरवरचा क्यूआर कोड स्कॅन करून ग्राहक आंबा उत्पादक शेतकऱ्याची माहिती जाणून घेऊ शकतील. आतापर्यंत एक कोटी स्टिकर्स तयार करण्यात आले असून देवगड तालुक्यातल्या ३०८ शेतकऱ्यांनी ५० लाखांहून अधिक स्टिकर्स घेतले आहेत.